सन २०२५-२६ साठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत तिन्ही प्रवर्गासाठी (सर्वसाधारण, अनु.जाती, अनु.जमाती) दुसऱ्या हप्त्याचा (केंद्र व राज्य हिस्सा) एकूण रु. १६६६.६६६६७ लाख निधीस वित्तीय मान्यता प्रदान करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : राअपोसुअ-२०२५/प्र.क्र.५७/४अे (ई-११०२१००)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०२ मार्च, २०२६

**वाचा:-**

१. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३१/१७-अे, दि.१९/०४/२०१७.
२. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-०९१९/प्र.क्र.२२१/१४-अे, दि.०४/११/२०२०.
३. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.राखातेअ-२०२५/प्र.क्र.५७/४-अे, दि.०६/०५/२०२५.
४. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३,दि.०७/०४/२०२५.
५. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्र.बीयुडी-२०२५/प्र.क्र.५८/अर्थ (विघयो), दि.१५/४/२०२५.
६. आदिवासी विकास विभाग शासन परिपत्रक क्र.बीयुडी-२०२५/प्र.क्र.०२/कार्यासन-६, दि.२१/०४/२०२५
७. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. राअपोसुअ-२०२५/प्र.क्र.५७/४अे (ई-११०२१००), दि.०२/०६/२०२५
८. केंद्र शासनाचे पत्र क्र.७३५ (MH१०), दि.२३/०२/२०२६.
९. कृषि आयुक्तालयाचे पत्र जाक्रकृआ/विप्र-१/कड आत्म नि./नि.वि.२५-२६ भाग-२/ प्र.क्र.०७/ र-२७०/ २०२६, दि.२६/०२/२०२६.

**प्रस्तावना :-**

सन २०२५-२६ साठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान-अन्नधान्य पिके व वाणिज्यिक पिके कार्यक्रमासाठी रु.३१३८०.६८५ लाखाच्या वार्षिक कृती आराखडयास (प्रलंबित दायित्वासह) वाचा येथिल अनु क्र.३, दि.०६/०५/२०२५ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर अभियानांतर्गत केंद्र शासनाने पहिल्या mother sanction द्वारे वितरित केलेला केंद्र हिस्सा रु.९४१४.२१०० लाख व त्यास समरुप राज्य हिस्सा रु. ६२७६.१४००० लाख असा एकूण रु.१५६९०.३५००० लाख निधी वाचा येथिल अनु क्र.७, दि.०२/०६/२०२५ च्या शासन निर्णयान्वये कृषि आयुक्तालयास बिम्स प्रणालीवर उपलब्ध करुन दिला आहे.

आता, केंद्र शासनाने त्यांच्या दि. २६ फेबुवारी, २०२६ च्या पत्रान्वये सदर अभियानांतर्गत तिन्ही प्रवर्गांकरिता (सर्वसाधारण, अनु.जाती, अनु.जमाती) दुसऱ्या mother sanction द्वारे, केंद्र हिश्श्याचा एकूण रु. १०००.०० लाख निधी वाचा येथिल अनु क्र.८, दि.२३/०२/२०२६ अन्वये वितरीत केलेला आहे. कृषि आयुक्तालयाच्या मागणीप्रमाणे, राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत तिन्ही प्रवर्गांकरिता केंद्र हिश्श्याचा रु.१०००.०० लाख व त्यास समरुप राज्य हिश्श्याचा रु.६६६.६६६६७ लाख असा एकूण रु.१६६६.६६६६७ लाख निधीस, वित्तीय मान्यता प्रदान करण्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:**

सन २०२५-२६ साठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत तिन्ही प्रवर्गासाठी केंद्र हिस्सा रु.१०००.०० लाख व त्यास समरुप राज्य हिस्सा रु.६६६.६६६६७ लाख अशा एकूण रु.१६६६.६६६६७ लाख (सोळा कोटी, सहासष्ट लाख, सहासष्ट हजार सहाशे सदुसष्ट फक्त) निधीस वित्तीय मान्यता देवून, या शासन निर्णयान्वये आयुक्त (कृषी) पुणे, यांना सदर निधी बीम्स प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. सदर निधीपैकी केंद्र व राज्य हिश्श्याच्या वितरीत निधीचे विवरण पुढीलप्रमाणे :-

(रू.लाखात)

| अ.क्र | State Linked Scheme (SLS) | सर्वसाधारण | अ.जाती | अ.जमाती | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | MH-10<br>राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान- अन्नधान्य पिके व वाणिज्यिक पिके<br>(केंद्र हिस्सा ६० टक्के) | ७८८.३००० | ११८.२००० | ९३.५०० | १०००.००० |
| २ | (राज्य हिस्सा ४० टक्के) | ५२५.५३३३३ | ७८.८००० | ६२.३३३३४ | ६६६.६६६६७ |
| | **एकूण** | १३१३.८३३३ | १९७.००० | १५५.८३३३४ | १६६६.६६६६७ |

३. राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत, अन्नधान्य पिके व वाणिज्यिक पिकांकरिता तिन्ही प्रवर्गाचा (सर्वसाधारण, अनु.जाती, अनु.जमाती) केंद्र व राज्य हिश्श्याचे प्रवर्गनिहाय व पीकनिहाय निधी वितरण **प्रपत्र -१** मध्ये दर्शविण्यात आले आहे.

४. सदर अभियानातंर्गत उपलब्ध करुन देण्यात आलेला केंद्र हिश्श्याचा रु.१०००.०० लाख ( दहा कोटी फक्त) व राज्य हिश्श्याचा रु.६६६.६६६६७ लाख (सहा कोटी, सहासष्ट लाख, सहासष्ट हजार सहाशे सदुसष्ट फक्त) निधी खालील लेखाशिर्षांतर्गत सन २०२५-२६ करिता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतुदीतून SNA-SPARSH खात्यातून खर्ची टाकावा.

| **प्रवर्ग** | **केंद्र हिस्सा** | **राज्य हिस्सा** |
|---|---|---|
| **सर्वसाधारण** | मागणी क्रमांक डी-३<br>२४०१- पीक संवर्धन<br>(००) (१०२) अन्नधान्य पिके<br>(००) (२५) कृषि उन्नती योजना- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्नधान्य पिके (केंद्र हिस्सा ६०%) (२४०१ ४६१४) (योजनांतर्गत) (दत्तमत) ३३, अर्थसहाय्य | मागणी क्रमांक डी-३<br>२४०१- पीक संवर्धन<br>(००) (१०२) अन्नधान्य पिके<br>(००) (३३) कृषि उन्नती योजना- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्नधान्य पिके (राज्य हिस्सा ४०%) (२४०१ A२३४) (योजनांतर्गत) (दत्तमत) ३३, अर्थसहाय्य |
| **अनुसूचित जाती** | मागणी क्रमांक एन-३<br>२४०१- पीक संवर्धन<br>(००)(७८९) अनुसूचीत जाती उपयोजना (००) (०५) कृषि उन्नती योजना- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्नधान्य पिके (केंद्र हिस्सा ६०%) अनुसूचित जाती उपयोजना (२४०१ B१०५),<br>३३, अर्थसहाय्य | मागणी क्रमांक एन-३<br>२४०१- पीक संवर्धन<br>(००)(७८९)अनुसूचीत जाती उपयोजना (००)(०६) कृषि उन्नती योजना- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्नधान्य पिके (राज्य हिस्सा ४०%) अनुसूचित जाती उपयोजना (२४०१ B११४),<br>३३, अर्थसहाय्य |
| **अनुसूचित जमाती** | मागणी क्रमांक टी-५<br>२४०१- पीक संवर्धन,<br>७९६-जनजाती क्षेत्रांतर्गत उपयोजना (पंचवार्षिक योजनांतर्गत योजना),<br>जनजाती क्षेत्राअंतर्गत उपयोजना,<br>(०१) (२१) कृषि उन्नती योजना- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्नधान्य पिके (केंद्र हिस्सा ६०%) (२४०१ A५५७)<br>३३, अर्थसहाय्य | मागणी क्रमांक टी-५<br>२४०१- पीक संवर्धन,<br>७९६-जनजाती क्षेत्रांतर्गत उपयोजना (पंचवार्षिक योजनांतर्गत योजना),<br>जनजाती क्षेत्राअंतर्गत उपयोजना,<br>(०१)(२२) कृषि उन्नती योजना- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्नधान्य पिके (राज्य हिस्सा ४०%) (२४०१ A५६६)<br>३३, अर्थसहाय्य |

५. सन २०२५-२६ मध्ये राज्यात सदर अभियानाची अमंलबजावणी व सनियंत्रण करण्याच्या दृष्टीने निधी आहरण व वितरण करणेसाठी, पुढीलप्रमाणे नियंत्रण तसेच, आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहेत.

| **स्तर** | **नियंत्रण अधिकारी** | **आहरण व संवितरण आधिकारी** |
|---|---|---|
| आयुक्तालय स्तर | आयुक्त (कृषि),<br>कृषी आयुक्तालय, पुणे | सहाय्यक संचालक (लेखा-१) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे. |

६. केंद्र शासनाने सदर अभियानातंर्गत विहित केल्याप्रमाणे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व महिला शेतकरी लाभार्थ्यांना सदर योजनेंतर्गत लाभ देण्यात यावा.

७. या शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचा तात्काळ विनियोग करण्यात यावा. तसेच, निधी विनियोगाच्या अनुषंगाने संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी वेळोवेळी उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

८. हा शासन निर्णय, वित्त विभागाचे, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०७/०४/२०२५, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्र.बीयुडी-२०२५/ प्र.क्र.५८/ अर्थ(विघयो), दि.१५/०४/२०२५ व आदिवासी विकास विभाग शासन परिपत्रक क्र.बीयुडी-२०२५/ प्र.क्र.०२/कार्यासन-६, दि.२१/०४/२०२५ नुसार विहीत केलेल्या अटींची पूर्तता होत असल्याने, तसेच, सदर परिपत्रकानुसार या विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

९. वरील वाचा क्र.३ मधील शासन निर्णयत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींचे पालन करुन या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात यावी.

१०. सदर अभियानांतर्गत केंद्र शासनाच्या वेळोवेळी प्राप्त सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३०२१२१२२९५१०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RUCHITA RANJAN PIMPLE

Digitally signed by RUCHITA RANJAN PIMPLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=4D2E14E1B5B622285A319D549438716BC45686280AAC03BEA60829E714C19298, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7E83BB07DDF0C67032F513E6336E3EE49F53DC047998C7012096DD9C8059D5FE, cn=RUCHITA RANJAN PIMPLE
Date: 2026.03.02 12:14:25 +05'30'

**( रुचिता पिंपळे )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.सभापती, विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२) मा. अध्यक्ष, विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४) मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११) मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला.
१३) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१४) सर्व विभागीय कृषि सहसंचालक.
१५) सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी.
१६) महालेखाकार ( स्थानिक निकाय लेखा परीक्षा व लेखा), मुंबई.

१७) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर.

१८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर.

१९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य.

२०) सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे.

२१) वित्त विभाग (कार्या. व्यय-१ / अर्थसंकल्प - १३), मंत्रालय, मुंबई

२२) निवड नस्ती-४ अ

शासन निर्णय क्रमांक : राअपोसुअ -२०२५/प्र.क्र.५७/४अे

## प्रपत्र - १

राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत, अन्नधान्य पिके व वाणिज्यिक पिकांकरिता तिन्ही प्रवर्गाचे (सर्वसाधारण, अनु.जाती, अनु.जमाती) केंद्र व राज्य हिश्श्याचे प्रवर्गनिहाय व पीकनिहाय निधी वितरणाचा तपशील

| अ.क्र. | पिक | सर्वसाधारण | | | अनु. जाती | | | अनु. जमाती | | | एकुण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | केंद्र हिस्सा | समरूप राज्य हिस्सा | एकुण | केंद्र हिस्सा | समरूप राज्य हिस्सा | एकुण | केंद्र हिस्सा | समरूप राज्य हिस्सा | एकुण | केंद्र हिस्सा | समरूप राज्य हिस्सा | एकुण |
| लेखाशीर्ष | | २४०१४६१४ | २४०१A२३४ | -- | २४०१B१०५ | २४०१B११४ | -- | २४०१A५५७ | २४०१A५६६ | -- | -- | -- | -- |
| १ | भात | १०५.००००० | ७०.००००० | १७५.००००० | १२.००००० | ८.००००० | २०.००००० | १५.००००० | १०.००००० | २५.००००० | १३२.००००० | ८८.००००० | **२२०.०००००** |
| २ | गहू | ४२.६०००० | २८.४०००० | ७१.००००० | ४.२०००० | २.८०००० | ७.००००० | १.२०००० | ०.८०००० | २.००००० | ४८.००००० | ३२.००००० | **८०.०००००** |
| ३ | भरडधान्य | ९४.८०००० | ६३.२०००० | १५८.००००० | १४.४०००० | ९.६०००० | २४.००००० | १०.८०००० | ७.२०००० | १८.००००० | १२०.००००० | ८०.००००० | **२००.०००००** |
| ४ | पौष्टिक तृणधान्य | ४६८.५०००० | ३१२.३३३३३ | ७८०.८३३३३ | ५३.४०००० | ३५.६०००० | ८९.००००० | ४६.७०००० | ३१.१३३३४ | ७७.८३३३४ | ५६८.६०००० | ३७९.०६६६७ | **९४७.६६६६७** |
| ५ | कापुस | ५३.४०००० | ३५.६०००० | ८९.००००० | २१.००००० | १४.००००० | ३५.००००० | १२.००००० | ८.००००० | २०.००००० | ८६.४०००० | ५७.६०००० | **१४४.०००००** |
| ६ | ऊस | २४.००००० | १६.००००० | ४०.००००० | १३.२०००० | ८.८०००० | २२.००००० | ७.८०००० | ५.२०००० | १३.००००० | ४५.००००० | ३०.००००० | **७५.०००००** |
| **एकुण** | | **७८८.३००००** | **५२५.५३३३३** | **१३१३.८३३३३** | **११८.२००००** | **७८.८००००** | **१९७.०००००** | **९३.५००००** | **६२.३३३३४** | **१५५.८३३३४** | **१०००.०००००** | **६६६.६६६६७** | **१६६६.६६६६७** |